**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 2, Mar-Apr – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/04/2020 Accepted on : 20/04/2020 Publication Date: 30/04/2020

# पवित्र जागा

**Dr. Ashwini P. Dehadrai**
Marathi Department, Bhartiya Vidhya Bbhavan Nagpur, Maharashtra, India
Email – pravindehadrai@gmail.com

**सारांश**: निसर्ग हा मानवासाठी नेहमीच वंदनीय आहे. हे अनेक पुराण कथांमधून स्पष्ट झाले आहे . संत साहित्यातही निसर्गाची महती आहे . विज्ञानाच्या मदतीने मनुष्याने त्यावर मात करण्याचा प्रयत्न केला. माणूस आणि निसर्ग यांचा संघर्ष झाला. तो जागोजागी आढळतो. पक्षी व प्राण्यांनी मात्र निसर्गासोबत असलेली नाळ कायम ठेवली आहे. त्यांच्या भावना, क्रीडा यातून ते स्पष्ट होते . आपल्या पूर्व दिव्याची नाते जोडण्यासाठी, त्यावर प्रकाश टाकण्यासाठी हे लेखन.

**मुख्य बिन्दू:** भारतीय संस्कृती, जंगलातील पवित्र जागा, मोरनाची, सारसनाची, सांबराच्या खुदानी.

## १ प्रस्तावना :

भारतीय संस्कृती पूर्वापार पशुपक्षी, वृक्ष, वनस्पती यांच्याशी जिव्हाळयाने राहते . मानवी कुटुंबात त्यांना प्रेमाचे स्थान दिले आहे . ' शुभम करोति' असो किंवा ' निंबोणीच्या झाडामागे ' यासारखे गीते असो असे संस्कार बालवयापासूनच आपल्यावर झालेले आहे. या बालमनाचे निसर्गाशी अनामिक नाते निर्माण झालेले आहे . आपण या निसर्गापासून वेगळे असू शकत नाही हे मात्र खरे. **व्यंकटेश माडगूळकर ' जंगलातील दिवस ' या पुस्तकात लिहितात, "माणूस देवपुत्र कसला , तो निसर्ग पुत्र आहे ! गॅलरीत दोन कुंड्या जोपासतो उशीच्या** अभ्र्यावर **पानं-फुलं विणतो. उघड आकाश , हिरव रान, बहरणारे पक्षी आणि खळाळत पाणी बघून आनंदात नाही असा माणूस असेल का?"** नक्कीच नाही. आपण या अफाट सृष्टीहून वेगळे असू शकत नाही. आपण गाईच्या स्वरूपात पशूशी संबंध जोडला. चिमण्या कावळे यांच्या नावाने बाळाला घास भरवतो. पक्षांचे स्मरण आपण करतो . देवाला तुळस हवी , बेल हवा , शमी पत्री हवी. देवाच्या निमित्ताने रोज सकाळी फुलांची भेट होते. त्यामुळे मन प्रसन्न राहते. देवाला पत्री वाहतात त्यामुळे घरच्या अंगणात काही झाडे लावून त्यांच्याप्रती प्रेमभावना निर्माण होत होती. वृक्षांची पूजा वटपौर्णिमा, औदुंबराची पूजा , आवळी भोजन हे सर्व निसर्ग सानिध्यासाठीच आपल्या पूर्वजांनी लावून ठेवले असणार. सोबतच पशुंची ही पूजा , गाय गोऱ्याची बारस , नागपंचमी, खंडोबाचे नवरात्र, बैलांचा पोळा असे सण उत्सव ही आपण साजरे करत होतो. अलीकडे त्याचे प्रमाण कमी झालेले जाणवते. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जीवन धोक्यात येईल. आज माणूस विज्ञानाच्या भरोशावर पुढे जात असताना ज्ञानाच्या दृष्टीने जो निसर्ग महत्वाचा आहे , तो विसरून प्रगती करू पाहत आहे . माणूस हा निसर्गातच उमलणार , फुलणार हे सूत्र आमच्या प्राचीन ऋषीमुनींना आणि संत-महंत यांना माहीत होते . भारतीय संस्कृतीत वनांना बरेच महत्त्व लाभले आहे. नैसर्गिक वातावरणात एकांत , दाट वनश्री , पशुपक्ष्यांची संगत यामुळे ही वने नैसर्गिक आनंदाची खानच होती . ऋषीमुनींना तर ही जंगले म्हणजे कर्मभूमी वाटत होती. अशा या शांतताप्रिय जंगलाचे वर्णन करताना संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

ऐसे **नी राहतयाते राहावी**
भ्रमातयाते **बैसवी**
**थापटूनि चेववी**
**विरक्तीते ज्ञाने. 6/68-169**
**हे राज्य वर सांडिजे**
मग **निवांता येथेचि असिजे**
**ऐसे शृंगारलियाही उपजे**
**देखतखेवो ज्ञाने.6/170**

असे निसर्ग सौंदर्याने नटलेले हे जंगल न राहणाऱ्या लाही राहावयास लावते. मन विचलित असेल , भरकटत असेल, तर त्याला ताळ्यावर आणते. वैराग्याला थापटी मारून जागे करते. ज्याच्या दर्शनाने किंवा सहवासाने एखाद्या विलासी पुरुषाला सुद्धा आपले राज्य ओवाळुन टाकावे असे वाटते आणि तो तिथे स्वस्थपणे राहातो. अशा शांत आणि सौंदर्याने नटलेल्या जंगलाच्या

ठिकाणी रमले नाही तर नवलच! कारण निसर्गसौंदर्याची देणगी त्या परिसराला लाभलेली असते. अशा वातावरणात ऋषीमुनींनच्या चिंतनाला प्रेरणा मिळत असे. म्हणून त्यांना जंगलाचे पर्यायाने निसर्गाचे अस्तित्व मान्य आहे. भारतातील बऱ्याच संतांनी आपल्या साहित्यातून निसर्ग दर्शन घडविले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास स्वामी, संत एकनाथ यासारख्या बऱ्याच संतांनी निसर्ग विचार मांडलेला दिसतो.

निसर्ग विषय घेऊन आधुनिक कवींनी देखील लेखन केले आहे. निसर्गकवी म्हणून प्रसिद्ध बालकवी यांच्या 'अरुण' या कवितेतील काव्य ओळी

**उठ कोकिळा! भारद्वाजा! ऊठ गडे आता,**
**मंगल गाणी टाकी** मोहूनि **जगताच्या चित्ता!**
**सरिते! गाणे तुझे सु**रांमधी **या मिळवी बाई!**
**साध्याभोळ्या तुझ्या गायना खंड मुळी नाही!**
**पिवळी कुरणे या गाण्याने** हर्षोत्कट **झाली,**
गाउ **लागली, नाचू लागली, वेडावुनि गेली!**
**चराचराच्या चित्ती भरले दिव्याचे गान!**
**मूर्त** गान **हे दिव्य तयाला गाणारे कोण?**
**दिव्य गायने, दिव्य शांतता, दिव्याचे झोत,**
**वसुंधरेच्या अरुण** ओतितो **नकळत हृदयात!**
**त्या दिव्याने स्वरभूमीचे ऐक्य असे केले**
त्या **दिव्याने मांगल्याचे** पाट **सुरू झाले!**
**मंगलता ती दिव्य कवीला टाकी मो**होनी
**वाग्देवीने सहज गुंफिली मग त्याची गाणी .**

अरुणाच्या आगमनाने झालेले सृष्टीतील सुंदर, आनंददायी बदल कवीने चित्रीत केले. जणू

आपण ही कविता अनुभवू लागतो. बालकवींचे हे विशेष आहे. ती गळी उतरवण्याचे सामर्थ्य जणू त्यांना निसर्गाने दिले असावे. ना. धो. महानोरांना ही रानाने भूल घातली आहे.

**"ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे**
**आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे**
**कोणती**पुण्ये **अशी येती फळाला**
**जोंधळ्याला चांदणे लख**डून **जावे**

**या नभाने या भुईला दान द्यावे**
**आणि माझ्या पापणीला पूर यावे**
**पाहता ऋतुगंध कांती सांडलेली**
**पाखरांशी खेळ मी मांडून गावे**

असे भावनिक नाते कवी महानोर यांचे आहे. आणखी बऱ्याच कवींना निसर्गाने वेड लावले आहे.मराठी गद्य लेखनानेही हा वारसा जपलेला आहे. दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळ, मारुती चितमपल्ली ही नावे सहज आठवण्यासारखी आहेत.

माणसाचे निसर्गाशी जवळचे नाते होते. आता मात्र माणूस निसर्गापासून दूर जाताना दिसतो. भयभीत झालेला आहे. दुर्दैवाने आम्ही आमच्या भौतिक आणि बौद्धिक जगात गुंतून गेलेले आहोत. आजूबाजूचा निसर्ग अनुभवण्याची क्षमता आम्ही हरवतो की काय? अशी शंका यायला लागली आहे. जन्मजात मानवात जी नैसर्गिक ओढ तिचा वापर जर आपण थांबवला, तर कदाचित निसर्ग म्हणजे काय? हे आपल्याला समजणार नाही. जगणं अतिशय तांत्रिक होत जाईल. आपण जे जगतो आहे , ते निसर्गामुळे जगतो आहे. नैसर्गिक जीवन शैली ही आपली खरी जीवनशैली असायला पाहिजे. दुर्दैवाने बदलत्या कालप्रवाहात आपण इतके वाहावत गेलो की आपण आपल्याच जगण्यावर घाला घालतो आहे, हे आपल्याला कळलच नाही. त्याच्यामुळे निसर्ग म्हणजे लाखो रुपये खर्च करून फिरायला जाणे नाही. माझ्या अवतीभवती असलेले , प्रत्येक झाड, पाने-फुले, येणारी हवेची झुळूक, माझ्या मनात उगवलेल्या गवताच्या पाती पासून तर एव्हरेस्टच्या बर्फापर्यंत सर्वत्र निसर्ग आहे. मग ती कडाडणारी विज असो किंवा एखादी चमचमणारी चांदनी असो ही सगळी निसर्गाची रूपे आहेत. ते पाहण्याची नजर असायला हवी.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 2, Mar-Apr – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/04/2020 Accepted on : 20/04/2020 Publication Date: 30/04/2020

पावसाळयाच्या सुरुवातीला गोगलगायी दिसतात . त्यातील एकीला काडीने स्पर्श केला, की ती लगेच गोल होते . म्हणून तिला पैशाची गोगलगाय म्हणतात. ही तिची पद्धत किती छान आहे! लाजाळूच्या झाडाला स्पर्श केला की ते झाड आपली सर्व पाने पटकन मिटतात. किती सुंदर आहे हे! मृगाचे किडे काळया मातीतील त्याचा लाल रंग लक्ष वेधून घेतो. असा निसर्ग आम्ही अनुभवला का? घरातल्या कुंडीत रोज फुल उमलते म्हणून मला त्याचं कौतुक वाटत नाही. मृगनक्षत्र सुरू होताच आकाशातून 'पेर्ते व्हा ' असा लहान पक्षाचा आवाज येतो. हा आवाज म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेली हाक आहे. पेरणीला सुरुवात करा हा इशारा हे पक्षी देतात. बस , रेल्वे , आणि गिरणीच्या खडखडाटात 'पेर्ते व्हा' ही साद लुप्त झाली. ती आम्हाला समजलीच नाही . आम्ही हे हरवलं आहे. माझ्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना म्हणजे निसर्ग. असा निसर्ग आम्ही जोपासला पाहिजे.

माणसाच्या अति हस्तक्षेपामुळे नाहीशा होत असलेल्या जंगलातील बऱ्याच जागा प्राण्यांनी, पक्षांनी जपल्या असतील का? असा प्रश्न मनात येतो. सद्यस्थितीत टीव्ही, वर्तमानपत्रे, मोबाईल अशा सर्व प्रसार माध्यमांचा चर्चेचा विषय विश्व महामारी कोरोना हाच आहे. सतत सतत हेच पाहून, वाचून मन उदास होत आहे. माणूस स्वरक्षणासाठी घरात बसला आहे. याचा परिणाम निसर्गावर होणारच. दिल्ली सारखी शहरे प्रदूषण मुक्त होत आहेत. पक्षी प्राणी निर्भयपणे वावरत आहेत. जंगलातील मोरनाची, तळ्याकाठच्या सारस नाची, सांबराच्या खुदानी नाहीशा होत आहेत, अशी खंत श्री मारुती चितमपल्लीनी व्यक्त केली होती. त्या जागा आता परत पशुपक्ष्यांना मिळाल्या असतील का? असा विचार मनात येतो. पशुपक्षांच्या या जागा आता मनुष्यविरहित झाल्या आहेत. त्यांना आपला जोडीदार निर्भयपणे आणि स्वच्छंदपणे निवडता येईल. अशा स्थळांना पक्षांच्या खाजगी जीवनात फार महत्त्व आहे.

**केव्हा मारुनी उंच भरारी, नभात जातो हा दूरवरी,**
**आनंदाची सृष्टी सारी, आनंदे भरली.**
**उंच भराऱ्या मारीत जाणे, रूप तुझे ते गोजिरवाणे!**
**गुंगुन जाईल चित्त जयाने, दे , दे ते गाणे!**

'आनंदपक्षी' या कवितेत बालकवींनी भराऱ्या मारणाऱ्या आणि आनंद वितरित जाणाऱ्या पक्षाचे सुंदर चित्र रेखाटले आहे. निसर्गाचे जिवंत चित्र या कवितेतून आपल्या दृष्टीस पडते . काव्याचा विषय झालेले अनेक पक्षी आहेत. मोर आणि सारस पक्षी यांच्या प्रणयी जीवनाचे चित्रण म्हणजे मोरनाची व सारनाची आहेत.

त्रिभुवनात मोरा एवढा सुंदर पक्षी दुसरा नाही. त्याचा मोह सर्वांनाच होतो. या पक्षाची प्रणयाची विशिष्ट जागा असते. त्या जागेला ' मोरनाची ' असे म्हणतात. घनदाट जंगलात मोरनाची सारखी स्थळे असतात. शंभर ते दीडशे फूट व्यासाची जागा असते. गवताचे ठोंब चोचीने काढून वर्तुळाबाहेर फेकलेले असतात. **"अशा रिंगणला** इंग्रजीत **लेक (Lek) अथवा मराठीत नाची म्हणतात. मुळ स्वीडिश शब्द ( Leka ) म्हणजे क्रीडा करणं यापासून Lek हा शब्द तयार झाला आहे. आशा प्रेम**याचनेच्या **रिंगणाचा प्रादेशिक क्षेत्र ( Territory ) अथवा घरटी बांधण्याच्या जागेशी संबंध नसतो."** अशी माहिती चितमपल्ली देतात. ही नाची माद्यांच संकेतस्थान असते. नाची म्हणजे असं स्थळ जिथे सर्व सजातीय नर माद्या एकत्रित होतात. हे वर्तुळ माद्यांमध्ये लैंगिक चेतना उत्पन्न करते. आणि तिथे त्याचा समागम होतो. सुरुवातीला या नाची क्षेत्रात नर पक्षी एकत्र जमतात. हे प्रणय रिंगण एकमेकां पासून दूर असतात. पण एका रिंगणातील नराचा आवाज दुसऱ्या नाची वर ऐकायला जातो. सगळेच मोर अतिशय सुंदर असतात. माद्या वर्तुळाबाहेर उभ्या असतात. नाची क्षेत्रात मध्यवर्ती स्थान घेण्यासाठी मोरानमध्ये जणू स्पर्धा सुरू असते. अधिक देखण्या व मध्यवर्ती असलेल्या नराकडे माद्या आकर्षित होतात. जणू स्वयंवराची राज्यसभा आहे , असे वाटते. एक एक राजकुमार एका पेक्षा एक अधिक देखणा व पराक्रमी असतो . त्यातलाच हा प्रकार वाटतो. या जागेत तो स्वतःचे कौशल्य दाखवत असतो. नृत्याचे सर्व पवित्रे तो करून दाखवून स्वतःचा प्रभाव माद्यांवर पाडीत असतो. मुळातच सुंदर पक्षी म्हणून मोराची गणना केली जाते. मोराच्या नृत्याने मानवाला मोहिनी घातली. त्यात त्याच जातीच्या माद्या कशा बरे सुटू शकतील? हे नृत्य लांडोरीला आकर्षित करण्यासाठी असते. तसेच ते प्रतिस्पर्धी नरांना आव्हान देण्यासाठी असते. स्वतःच्या कलागुणांनी इतरांना प्रभावित करणे हा गुण माणसांनी पक्षांकडून स्वीकारला असावा असे वाटते. माद्या त्या प्रभावी नराला पसंत करतात. पक्षी जगतात मादीपेक्षा पेक्षा नर सुंदर असतो. अशा या सुंदर कलागुणी असलेल्या मोराशी लांडोरी समागम करण्यास इच्छुक असतात. माद्यांना नर निवडण्याचे स्वातंत्र्य असते. स्वयंवर ही संकल्पना मानवाने इथूनच स्वीकारली असावी. स्वयंवराच्या वेळी वरा कडून असलेल्या अपेक्षांची पूर्ती होते, तेव्हा ती विवाह इच्छुक वधु त्याला आपला वर म्हणून स्वीकारते. तसाच हा प्रकार इथे दिसतो. रिंगणातील मोर प्रभावी तर असतोच. त्याचा आवाजही बुलंद असतो. सुंदरते सोबत आवाजाचं वरदानही त्यांना मिळालेले असते. म्हणजे एखाद्या देखण्या रुबाबदार मुलाला मोठा पगार असतो. त्याचप्रमाणे हे गणित असावं असं वाटतं. इथे नैसर्गिक निवडीवर भर दिला जातो. त्याच्या बुलंद आवाजाने लांडोरिंना त्याचं अस्तित्व कळते. रिंगणात मोर एक पाय दुमडून नाचतो. लांडोरी त्याच्या नृत्यावर मुग्ध होतात. तो लांडोरी वर झपाटतो . ती लाजून खाली बसते. फुललेला पिसारा अर्धवट मिटून क्षणभर

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 2, Mar-Apr – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/04/2020 Accepted on : 20/04/2020 Publication Date: 30/04/2020

त्यांची रतिक्रीडा चालते. मोर परत उडी मारून रिंगणात येतो. लांडोरी पुढे जाते. पुन्हा त्याच प्रमाणे दुसऱ्या लांडोरीशी तो रतिक्रीडा करतो. असा प्रकार सात-आठ लांडोरीशी करतो. तो देखणा मोर आपलं नृत्य थांबवून मोरनाची तून हळूहळू बाहेर पडतो. त्याच्या मागोमाग सात-आठ लांडोरी जंगलात निघून जातात. त्या देखण्या मोराने जागा सोडल्या बरोबर ती मध्यवर्ती जागा दुसरा मोर घेतो. तोपण पहिल्या मोरा प्रमाणे प्रियराधना करतो. हा सर्व खेळ दिवसभर चालू असतो. इच्छा प्राप्तीनंतर मन आनंदविभोर होतं. त्याच प्रमाणे ते सर्व आनंदविभोर होऊन जंगलात जातात. हे दृश्य पावसाळयाच्या सुरुवातीच्या काळात जाणकाराच्या किंवा अभ्यासकाच्या दृष्टीस पडू शकते. स्वतःहून त्या रिंगणाचा त्याग तो मोर करतो. इथे खुर्चीच्या किंवा सत्तेच्या हव्यासापासून पक्षीजगत खूप दूर आहे हे दृष्टीस पडते. वेळेपुरता अधिकार मग मात्र इतरांना संधी असा त्यांचा न्याय असतो.

## २ सारसनाची :

मातापित्यांच्या आज्ञेचे पालन न करणे म्हणजे आपल्या नशिबी मृत्यू हे पक्षांच्या पिल्लांना माहिती असते. थोरामोठ्यांचा आदरही यातून दिसून येतो. पक्षांकडून बरेच गुण मानवाने स्वीकारायाला हरकत नाही. तसेच अपरिग्रहाची वृत्ती हा पक्षांचा वाखाणण्यासारखा गुण आहे. मृत्यूबद्दल शोक नाही. सार काही शांततेत घडत जातं. मृत्यू जवळ आला म्हणून मृत्युपत्र नाही की चिठ्ठी नाही. अनासक्त वृत्ती पाखरात दिसते. सारस, चक्रवाक आणि हंसा ची जोडी एकदा तयार झाली की ते आयुष्यभर एकमेकांना साथ देतात.

सारस पक्षांचे शृंगारिक जीवन सुंदर असते. जून महिन्याच्या सुरुवातीला ठरलेल्या बांधा काठी हे पक्षी एकत्रित येतात. ते थव्यांनी येतात. सूर्यास्ताच्या वेळी बांधा काठी सारसांचा थवा वर्तुळाकार एकत्र येतात . ते शांतपणे एकत्र उभे असतात. मादीपेक्षा नर थोडा उंच असतो, एवढाच फरक नर आणि मादी मध्ये असतो. संधीप्रकाशातही ते शांतपणे उभे असतात. जणू त्यांचा परिचय मेळावा भरलेला असतो. न बोलता हा कार्यक्रम संपला की पक्षी चरायला जातात. एकमेकांबद्दलचा अभ्यास किंवा निरीक्षण दोन-तीन दिवस सुरू असते. ठरलेल्या वेळी सूर्यास्तापूर्वी सारेजण त्याच जागी गोळा होतात . चौथ्या दिवशी मात्र आश्चर्य घडते. त्यांच्या जोड्या तयार होतात. न बोलता फक्त निरीक्षणाने ते आपला साथीदार निवडतात. प्रेमविवाह जणू. शब्दाविना त्यांना कसे बरे शक्य झाले असेल. शब्दाविना संवाद हा परमोच्च अवस्थेला पोहोचलेल्या गुरु शिष्यांमध्ये, दोन खऱ्या मित्रांमध्ये, एकमेकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या पती-पत्नींमध्ये. म्हणजे एकाने घेतलेला निर्णय दुसऱ्याला मान्य असतो व पटतोही. याच न्यायाने ते आपला सहचारी निवडत असावेत असे वाटते. हे पक्षी पुर्वीसारखे शांत राहत नाही. त्यांना कंठ फुटतो. त्यांचे मधुर कूजन सुरू होते. जोडीने एकमेकांचा अनुनय करू लागतात. सारस नर कामविव्हल होऊन मादीला साद घालतो . मादी जवळ येताच त्यांचे शाहीनृत्य सुरू होते. दोघेही सुरेख पदन्यास करतात.

माणसांच्या ' सालसा ' नृत्याप्रमाणे . प्रत्येक युगल एकमेकांना साथ देतो. त्यांच्या नाना कला एकमेकांना दाखवत आपला प्रभाव पाडतात. पंख फडफडवितात, मान वेळावतात, स्वतः भोवती पिंगा घालतात. एकत्रित मधुर कूजन करतात. उडण्याच्या सर्व कला सादर करतात. एकमेकांच्या प्रेमात पडतात ते आयुष्यभरासाठी. इथेच त्यांचा समागम होतो. या क्षेत्रालाच 'सारसनाची' म्हणतात.

## ३ सांबराच्या खुदानी :

शृंगाराला मानव, पशु, पक्षी यासगळयांच्या जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. अल्हाददायी वातावरण, सोबतच निसर्गाची साद अशा वातावरणात आपला सहचारी आपल्यासोबत असतो, तेव्हा ती वेळ मनाला स्पर्शून जाते. असाच काहीसा अनुभव जंगलातील महत्त्वाच्या स्थळी येतो. जिथे मनुष्यप्राण्याला शृंगाराने भूल घातली, तसे प्राणी जगातही सुटले नाही.

'सांबराच्या खुदानी' याचा अर्थ चितमपल्ली यांनी सांबराची क्रीडा किंवा त्याच्या खेळण्याची जागा असा सांगितला आहे. आपल्यापैकी किती जणांनी ह्या जागा पाहिल्या असतील? असा प्रश्न पडतो. सांबराचा कळप बऱ्याच जणांनी पाहिला असणार. खुदानी सारख्या महत्वाच्या जागा दाट जंगलात असतात. जिथे स्मशान शांतता आहे, अशा जागा सांबर शोधतात. त्यांना त्या स्थळी मानवाचा हस्तक्षेप मान्य नाही. मानवाची चाहूल लागली तरी ते खुदानीत उतरणार नाहीत.

खुदान म्हणजे नेमके काय? तर आपण असे म्हणू शकतो आपल्या मुलांना खेळण्यासाठी जे ग्राउंड असते, तसाच प्रकार इथे असतो . गल्लीतली मुले खेळायला निघाली की आपल्या मित्रांना आवाज देऊन जमा करतात आणि खेळतात. असेच एका सांबराने आवाज काढला की सर्व बाजूने त्याचे मित्र त्याला प्रतिसाद देतात. चरायचे सोडून, साद घालून' तू चल मी आलोच'असे म्हणत खुदानीत एकत्र जमतात.

खुदानीचे क्षेत्र अंदाजे अर्ध्या एकर पेक्षाही मोठे असते.

ते ग्राऊंड खेळण्यासाठी सज्ज असते. म्हणजे त्यात गोटे व झुडपे काहीही नसतात. जागा खुरांनी मऊ केलेली असते. चार-पाच सांबर मित्रे आपसात टक्कर टक्कर खेळतात. शिंगांचा आवाज करतात. यावेळी माद्या आणि पाडस हा खेळ रिंगणाबाहेरून

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 2, Mar-Apr – 2020
**Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal** Impact Factor: 3.589
**Received on : 07/04/2020** **Accepted on : 20/04/2020** **Publication Date: 30/04/2020**

पहात असतात. एक दोन वर्षाचे नर देखील संधीसाधून आत प्रवेश घेऊन खेळ शिकण्याचा प्रयत्न करतात. पण अनुभवाच्या अभावाने ते बाहेर येतात. अनुभवी सांबर खुदानीत टक्कर देऊन धावतात. हा एक दोन तासांचा खेळ चांगलाच रमतो. जवळच्या झाडांना जाऊन अंग व शिंग घासतात. त्यातला अनेक डेऱ्याचा बलाढ्य सांबर बकऱ्यासारखा दोन पायांवर उभा राहतो. दोन्ही खुरं आठदहाफूट उंचीवर घासतो. हे आपले राज्य आहे, हेच जणू इतरांना पटवून देत असतो. तिथून त्वेषाने पुन्हा खुदानीत येतो. आपल्या प्रतिस्पर्ध्यावर तुटून पडतो. खेळाचं रूपांतर आता लढाईत होते. दुबळा सांबर माघार घेतो.खुदान सोडून जंगलात दिसेनासा होतो . 'तुला पुन्हा पाहून घेईन'या भावनेने मात्र नाही. सामनावीर सांबर खुदानीत मुततो . रिंगणाच्या बाहेर उभ्या असलेल्या सांबरीपैकी रुबाबदार त्याला साजेशी अशी एक सशक्त मादी खुदानीत प्रवेश करते. मी तुझा स्वीकार केला हेच सुचवण्यासाठी ती त्याचे मूत्र हुंगते. त्या सामनावीर सांबराजवळ जाते . त्याचे अंग आणि मुख हुंगते. आपल्याप्रीतीची त्याला भुरळ घालून लगट करू लागते. इतर प्रेक्षक सांबर आता खुदनीत उतरतात. जणू विजयोत्सव साजरा करतात. ते रवंथ करीत बसतात. प्रेमीयुगल मात्र बासाच्या रंजीआड उभी होतात. माणूस आपल्या भावनांवर विजय प्राप्त करू शकला नाही .ही खरी शोकांतिका. म्हणून नको ती दृश्य रस्त्यावर, बागेत दिसतात. इतर लोक तिथे असतात याचे भान नसते. पण प्राण्यांनी ते भान जपले आहे. हेच इथे दिसून येते.

आपला सहचारी निवडण्याचे स्वातंत्र्य प्राण्यांमध्ये आहे. ते माणसांनीही स्वीकारलं . पण प्राण्यांचा शहाणपणा बाजूला ठेवला. जेव्हा एखादी चांगली गोष्ट स्वीकारतो, तेव्हा त्याचा पूर्णपणे स्वीकार करायला हवा. तुमचं स्वातंत्र्य तुम्ही कोणालाही हिरावून घेऊ देत नाही. तसच इतरांचं स्वातंत्र्य तुम्ही हिरावून घेऊ शकत नाही. प्राण्यांच्या पवित्र जागा अभ्यासकांच्या दृष्टिआड होऊ नये या साठी तरी प्रयत्नशील असले पाहिजे.

ज्ञानी समजणाऱ्या माणसाच्या अज्ञानामुळे त्या जागेचे पावित्र्य राखले जात नाही. शेवटी परिणाम त्यांच्यावर वंशवृद्धीवर होतो. माणसाच्या जंगल फेरीला बंदी केल्यामुळे हे सर्व प्राणी निर्भयपणे वावरत असतील . लोकसंख्या वाढीमुळे लोकांनी वनाच्या सीमा ओलांडल्या आहेत. सध्यास्थितीत माणसांनी हडपले ल्या जागा प्राण्यांनी पुन्हा मिळवून प्राणी मुक्त संचार करताना प्रसारमाध्यमांमध्ये दाखवत आहेत. सर्व जंगलातील वाघ सुद्धा सुटकेचा निश्वास सोडत असतील. स्वतःचे साम्राज्य पुन्हा मिळवल्याच्या आनंदात असतील. परत जालंदर वरून हिमालय दर्शन घडत आहे. सृष्टीतील महत्वाचे पूर्व दर्शन घडत आहे. हे कमी होणारे प्रदूषण सृष्टीला निश्चित उभारी देऊ शकेल. पशुपक्षी आनंदात आहेत. मानवप्राणी घरपण उपभोगत आहे. हे सर्व विषाणू कोरोना मुळे. आता तरी सर्वांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी माणूस तत्पर असेल का? स्वतःसोबत निसर्गाचाही विचार करेल असे वाटते. शेवटी एवढेच वाटते माणसाला इतरांबद्दल जाण देणारा कोरोना आता संपला पाहिजे. कारण खरच माणूस घरात राहून जागरूक झाला आहे. ही जाणीव क्षणकाल तर असणार नाही ना? ही भीती मात्र मनाला अजूनही भेडसावते आहे. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील फरक आतातरी आपण समजून घेऊया. आपल्या स्वातंत्र्यामुळे इतरांच्या आणि विशेषतः निसर्गाच्या जगण्याच्या स्वातंत्र्यावर नकारार्थी परिणाम होऊ नये ही जाणीव यानिमित्त होणे गरजेचे आहे. हा काळ प्रत्येका करता निश्चितच वेदनादायी आहे. पण या वेदनेतून आपल्या संवेदना उजळल्या तर सृष्टीच भविष्य अधिक उज्वल होईल हे निश्चित.

**सन्दर्भ:**


1. **जंगलातील दिवस - व्यंकटेश माडगूळकर**
2. **सार्थ ज्ञानेश्वरी - संपादक - बाळकृष्ण अनंत भिडे**
3. **फुलराणी बालकवींची निवडक कवित - संपादक - कुसुमाग्रज**
4. **रानातल्या कविता - ना. धो. महानोर**
5. **नवेगावबांधचे दिवस - मारुती चितमपल्ली**